# मिरा भाईंदर महानगरपालिका

## लेखापरीक्षण अहवाल

## सन-२००४-०५

# सन २००४-०५ या वित्तीय वर्षाचा वार्षिक अहवाल

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ९ चे कलम १०६(३) नुसार प्रत्येक सरकारी वर्ष सुरु झाल्यानंतर नगरपालिका मुख्यलेखापरीक्षकाने महानगरपालिकेच्या मागील वर्षाच्या संपूर्ण लेख्यावरील आपला अहवाल स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार सन २००४-०५ या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षण अहवाल मा. स्थायी समितीपुढे ठेवण्यासाठी सादर करीत आहे.

प्रस्तावना:-

१) मिरा भाईंदर महानगरपालिका दि.२८/२/२००२ रोजी अस्तित्वात आली. त्यापूर्वी लेखापरीक्षण महाराष्ट्र शासनाच्या मुख्यलेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा या कार्यालयामार्फत केले जात होते. महानगरपालिकेच्या स्थापनेनंतर सदरचे लेखापरीक्षण महानगरपालिकेच्या मुख्यलेखापरीक्षकांमार्फत होत आहे. त्यानुसार जमा रक्कमांचे उत्तर लेखापरीक्षण व खर्चाचे पूर्व लेखापरीक्षण केले जाते. पुर्व लेखापरीक्षणामुळे काम सुरु होण्यापूर्वीच अनियमितता निदर्शनास आल्यास त्यावर नियंत्रण ठेवता येते व पालिकेच्या निधीचा संभाव्य गैरवापर टाळता येतो.

महानगरपालिकेतील लेखापरीक्षण विभागामध्ये मुख्य लेखापरीक्षक, सहा. लेखापरीक्षक व दोन लिपीक कार्यरत आहेत. त्यामुळे जमा रक्कमांचे १००% लेखापरीक्षण करणे शक्य होत नाही. प्रचलित पद्धतीनुसार चाचणी लेखापरीक्षण करण्यात आलेले आहे. त्यासंबंधीचे आक्षेप व संबंधित विभागाने त्यावरील खुलासेही दिलेले आहेत. तसेच लेखाविषयक सुधारणा करण्याच्या दृष्टिने काही उपयोजनाही सुचविलेल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही होणे आवश्यक आहे.

स्थानिक निधी लेखा कार्यालयाच्या प्रंलबित लेखापरीक्षण परिच्छेदाची अदयावत माहिती

| आरंभीची शिल्लक | दि.७/६/०४ रोजी वगळण्यात आलेले परिच्छेद | शिल्लक |
|---|---|---|
| २४४ | ३४+६(उपपरिच्छेद) | २१० |
| २१० | दि.२२/६/०५ रोजी वगळण्यात आलेले परिच्छेद ६० | १५० |

शिल्लक १५० परिच्छेदांचे अनुपालन संबंधित विभागांकडून झालेले नसल्याने संबंधित विभागांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्याची पूर्तता होणे आवश्यक आहे.

सोबत विभाग निहाय प्रलंबित लेखापरीक्षण परिच्छेदांची अदयावत माहिती जोडली आहे.(विवरणपत्र-१)

<u>२) केंद्र सरकारच्या महालेखापरीक्षक कार्यालयाच्या लेखापरीक्षण अहवालाबाबत:-</u>

शासन पत्र क्र. जी.ई.एन.१०९९/८२९/प्र.क्र.४६/९९नवि-२४ दि.१८/१/२००३ नुसार महानगरपालिकेचे लेखापरीक्षण हे केंद्र सरकारच्या महालेखापरीक्षकांकडून होणार असल्याचे कळविण्यात आले होते व त्यानुसार महानगरपालिका स्थापन झाल्यापासून माहे मार्च २००४ पर्यंतच्या कालावधीचे लेखापरीक्षण माहे नोव्हेंबर-डिसेंबर २००४ मध्ये करण्यात आले. सदर अहवालातील लेखापरीक्षण परिच्छेदांची अदयावत माहिती खालीलप्रमाणे आहे.

| आरंभीची शिल्लक | महालेखापरीक्षक कार्यालयाने काढलेले परिच्छेदांची संख्या (२८/२/०२ ते ३१/३/०४) | अनुपालन मान्यते नंतर वगळण्यात आलेल्या परिच्छेदांची संख्या | शिल्लक |
|---|---|---|---|
| निरंक | ५९ | निरंक | ५९ |

महालेखापरीक्षक कार्यालयाच्या लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेदांचे अनुपालन करण्याबाबत संबंधित विभागांना कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार काही विभागांनी अनुपालन सादर केले होते. परंतु सदरचे अनुपालन महालेखापरीक्षक कार्यालयाने मान्य न केल्याने सर्व परिच्छेद अदयाप प्रलंबित आहे. सोबत विभाग निहाय प्रलंबित लेखापरीक्षण परिच्छेदांची माहिती जोडली आहे. (विवरण पत्र-२)

### ३) विशेष लेखापरीक्षण अहवालाबाबत (परिच्छेद-३६)

तत्कालीन मिरा भाईंदर नगरपरिषदेचे दि.२/९/८५ ते २७/२/०२ या कालावधीचे विशेष लेखापरीक्षण मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी केलेले होते. त्याचा अहवाल दि.१०/१/२००३ रोजी निर्गमित केला होता. उक्त अहवाल दि.२४/१/०३ रोजी कार्यालयास प्राप्त झालेला आहे. त्याचा अनुपालन अहवाल चार महिन्याच्या आत मा.महासभेच्या मंजुरीने मुख्यलेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य यांना पाठविणे आवश्यक होते. परंतु दोन ते अडीच वर्षे होवुनही अहवाल सादर करण्यात आलेला नाही. याबाबत स्पष्टीकरण करण्यात येते की, तत्कालीन अंतर्गत लेखापरीक्षकांनी सदरचा अहवाल अनुपालन न करताच सचिवाकडे महासभेपुढे ठेवण्यासाठी पाठविला होता. परंतु नंतर ही त्रुटी लक्षात आली असता लेखापरीक्षण विभागाने पुन्हा तो अहवाल परत घेवून अनुपालनासाठी सदर आक्षेप तत्कालीन लेखापाल यांचेकडे पाठविण्यात आला. तसेच विशेष लेखापरीक्षणाबाबत पाठपुरावा केला असता तत्कालीन संबंधित लेखापाल श्री. विजय पाटील यांनी लेखी अनुपालन अहवाल सादर केला. परंतु त्यासंबंधीचे लेखे लेखापरीक्षण विभागास दाखविले नाहीत. त्यामुळे त्यांना या शाखेच पत्र क्र.मनपा/अंलेप/२८/२००४-०५ दि.२९/४/०४ व समक्रमाकाच्या दि.२७/५/०४, दि.१७/७/०४, दि.३/१२/०४ व दि.७/१०/०५ च्या पत्रान्वये संबंधित लेखे तपासणीसाठी पाठविण्याबाबत विनंती करण्यात आली परंतु त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले म्हणून सध्याचे लेखापाल यांनाही सदरचे लेखे पाठविण्याविषयी विनंती केली. तथापि त्यांनीही श्री. विजय पाटील, तत्कालीन लेखापाल यांना सदरचे लेखे पाठविण्याची विनंती केल्याचे या विभागास कळविले आहे. सदरचे लेखे उपलब्ध होत नसल्याने लेखापरीक्षण विभागाला विशेष लेखापरीक्षणाचा अनुपालन अहवाल मा. महासभेच्या मंजुरीसाठी ठेवणे शक्य होत नसल्याची वस्तुस्थिती सन २००३-०४ या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालान्वये मा.स्थायी समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आली आहे. तसेच गेल्या वर्षीच्या अहवालाच्या अनुषंगाने झालेला ठराव क्र.१४३ दि.२९/१/०५ अन्वये श्री विजय

पाटील यांना या शाखेचे पत्र क्र. मनपा/अंलेप/६१०/२००४-०५ दि.१७/२/०५ नुसार एक महिन्याच्या आत परिपूर्ण अनुपालन अहवाल मा.महासभेपुढे ठेवण्याबाबतची कार्यवाही करण्याबाबत कळविले होते. परंतु त्यांनी दखल घेतलेली नाही.

सदर अहवालाचे अनुपालन तात्काळ करण्याविषयी स्थानिक निधी लेखा कार्यालयाकडून विचारणा होत असल्याने तात्काळ कार्यवाही होणे अपेक्षित आहे. सदर विलंबाबाबत तत्कालीन लेखापालाचा खुलासा घेण्यात यावा अशी शिफारस मा.स्थायी समितीस करण्यात येत आहे. तसेच त्यांचेवर पुढील कारवाई होणे अपेक्षित आहे. विशेष लेखापरीक्षण अहवालावरील अनुपालनास श्री. विजय पाटील यांचेमुळे विलंब होत असल्याने या विलंबाची सर्व जबाबदारी त्यांच्यावर निश्चित करण्याची शिफारस करण्यात येत आहे. कारण श्री विजय पाटील यांनी संबंधित नोंदवहया व कागदपत्रे सध्याचे लेखापाल यांचेकडून घेतलेल्या आहेत.

सदरचे अहवालाचे अनुपाल लवकरात लवकर मुख्यलेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर न केल्यास शासन स्तरावरुन कारवाई होवू शकते. त्यामुळे याबाबत तात्काळ निर्णय होणे आवश्यक आहे.

<u>४) अंतर्गत लेखापरीक्षण अहवाल:-</u>

सन २००३-०४ या वित्तीय वर्षातील सर्व परिच्छेदांचे अनुपालन अदयाप प्रलंबित आहे.

## <u>लेखा विभाग</u>

<u>परि.क्र. १) ताळमेळ विवरणपत्राबाबत:-</u>

लेखा शाखेची दि.३१/३/०५ ची सर्वसाधारण रोखवही व विविध बँकांच्या विवरणपत्रांची पडताळणी केली असता खालीलप्रमाणे विसंगती निदर्शनास आली.

| अ.क्र. | बँकेचे नाव | सर्वसाधारण रोखवही प्रमाणे शिल्लक | बँक विवरणपत्राप्रमाणे शिल्लक |
|---|---|---|---|
| १ | ठाणे जिल्हा बँक | ४०,४६,३८३.९७ | १,८१,१६,१०६.४७ |
| २ | एस.बी.आय. | २,६९,९२,२३६.४५ | ५,०७,९२,५०८.९४ |
| ३ | विजया बँक | ३७,७१,५९८.४१ | ८,४३,८४५.३१ |
| ४ | इंडियन बँक | ४,८१,३३९.५५ | २३,३४,९४६.५५ |
| ५ | देना बँक | ७३,४२७.०० | ५,३३,०२०.०० |
| ६ | ओ.बी.सी | ५२,६३,२३२.०० | १,९२,१२,६१५.०० |
| ७ | मुदत ठेवी | ११,६५,४५०.०० | ----- |
| ८ | पोस्ट | २८,६४१.८० | ----- |

महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता १९७१ मधील विषय क्र.५१ अन्वये सर्वसाधारण रोकडवहीतील लेखे रोजच्या रोज बंद करुन प्राधिकृत अधिकाऱ्याने स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. प्रत्येक महिन्याच्या शेवटी रोकडवहीत जमा व खर्चाच्या रक्कमांची पासबुकाशी तुलना करुन शिल्लकेची जुळणी करुन जर काही फरक असेल तर उक्त नियमातील तरतुदीप्रमाणे रोकडवहीत स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे.

**<u>परि. क्र. २) अदत्त नोंदवहीबाबत:-</u>**

महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहित १९७१ मधील नियम क्र.३२(२) नुसार प्रदाने रोखीने अथवा धनादेशाद्वारे जसजशी संवितरीत केली जातील तसतशी प्रतिदिन क्रमवार दिनांकासह नोंदण्याविषयी व नियम क्र.४३ नुसार रोखीने अथवा धनादेशाद्वारे काढलेली एखादी रक्कम अप्रदानित रहाते. तेव्हा अशी रक्कम नमुना क्र.२३ प्रमाणे ठेवावयाच्या अदत्त रक्कमांचे पुस्तकांत नोंदणे आवश्यक आहे.

परि. क्र. ३) पावत्याबाबत:-

लेखा शाखेद्वारे काही प्रकरणी प्रदान स्विकारणाऱ्याकडून स्वाक्षरी अथवा पावती प्राप्त न करताही प्रदान केल्याचे निदर्शनास येते. तरी या प्रकरणी लेखा संहितेच्या नियम क्र.१९ व २० नुसार पावती प्राप्त केल्यावरच प्रदान करणे आवश्यक आहे.

परि.क्र. ४) तिजोरीच्या सुरक्षितेबाबत:-

मनपाकडे दररोज लाखो रुपयांची रक्कम प्राप्त होत असते. परंतु लेखा शाखेकडे असलेली तिजोरी ही सुरक्षित वाटत नाही. त्यासाठी लेखा शाखेची तिजोरी भिंतीमध्ये सिमेंटच्या पक्क्या बांधकामाने बसविणे आवश्यक आहे.

परि.क्र. ५) अग्रीम वसुलीबाबत:-

सन २००४-०५ या वित्तीय वर्षअखेरीस रु. ३४,१३,९५४/- एवढया अग्रिम रक्कमेचे समायोजन होणे बाकी आहे. तसेच सदरपैकी काही रक्कमा सन १९९३-९४ पासून प्रलंबित असल्याचे दिसते. तरी अग्रिमाची रक्कम संबंधिताकडून व्याजासह वसुल करण्यात येवून कार्यवाही करण्यात यावी.

परि.क्र. ६) अनुदानांबाबत:-

दि.३१/३/०५ अखेरपर्यंत शासनाकडून मनपास रु.१८५ लाखांचे अनुदान प्राप्त झालेले नाही. त्यामुळे शासनाकडे पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

तसेच विकासकामासाठी प्राप्त झालेली रु.९९,७४,०००/- ची अनुदाने या वित्तीय वर्षात खर्ची पडलेली नाहीत. त्यामुळे सदरची रक्कम व्यपगत होण्याची शक्यता आहे.

तसेच नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.आरडीएस-१०२००५/प्र.क्र.३१/२००५/ नवि-१६ दि.३१/३/२००५ नुसार सर्वसाधारण रस्ते अनुदानापोटी प्राप्त होणारी रक्कम रु. ५,४१,८०,०००/- ही शासनाने मनपाकडून शिक्षण उपकर व रोजगार हमीकर रु. २८,९७,०००/- व कब्जा हक्काची रक्कम रु. ५,१२,८३,०००/- यापोटी देय असलेली

रक्कम समायोजित केली आहे. तरी सदर रक्कमेची नोंद मनपाच्या लेख्यांमध्ये होणे आवश्यक आहे.

आस्थापना शाखा

परि.क्र. ७) सेवापुस्तकः- श्री. विजय पाटील

श्री विजय पाटील यांचे सेवापुस्तक व सेवा नस्ती तपासली असता खालील बाबी निदर्शनास आल्यात.

अ) श्री. पाटील यांना एल.एस.जी.डी परीक्षा उत्तीर्ण झाल्याने दि.१/७/८७ पासून दोन वेतनवाढी दिल्या आहेत. परंतु सदरच्या वेतनवाढी नियमबाहय असल्याने रद्द करुन संबंधितांकडून रक्कमेची वसुली करण्यात यावी.

ब) श्री. पाटील यांच्या सेवापुस्ताकातील दि.१९/११/८६ ते दि.१८/१२/८६, दि.२३/३/८७ ते दि.२९/३/८७, दि.२३/३/८७ ते २९/३/८७, दि.१/९/८८ ते दि.१०/९/८८ व दि.१३/१/९२ ते २३/१/९२ या कालावधीच्या रजा सक्षम अधिकाऱ्याने साक्षांकित केलेल्या नाहीत. तसेच निलंबनानंतर दि.२/११/९३ रोजी पुन्हा सेवेत घेतल्याची नोंद साक्षांकीत नाही.

परि.क्र. ८) सेवापुस्तक पडताळणीः- श्री. हरेश पाटील

श्री. हरेश पाटील यांचे सेवापुस्तक व नस्ती तपासली असता खालील बाबी निदर्शनास आल्यात.

अ) श्री. पाटील एल.एस.जी.डी परीक्षा उत्तीर्ण झाल्याने त्यांना दि.१/७/८७ पासून दोन वेतनवाढी मंजूर केल्या आहेत. परंतु सदरच्या वेतनवाढी नियमबाहय असल्याने रद्द करण्यात येवून वसुली करण्यात यावी.

ब) श्री. पाटील यांच्या सेवापुस्तकातील दि. ८/१/९८ ते दि.१९/१/९८ व दि.९/४/२००१ ते २९/४/२००१ या कालावधीच्या रजा नोंदी साक्षांकित नाहीत

क) वार्षिक वेतनवाढीच्या नोंदी साक्षांकीत नाहीत.

## परि.क्र. ९) सेवापुस्तक पडताळणी- श्री. गणेश पाटील

श्री. गणेश पाटील यांचे सेवापुस्तक व नस्ती तपासली असता खालील बाबी निदर्शनास आल्यात.

अ) वार्षिक वेतनवाढी साक्षांकित नाहीत.

ब) दि.१३/४/०५ ते ३०/५/०५ पर्यंतची आर्थिक रजा रजा खात्यातून वजा करण्यात आलेली नाही.

क) सेवापुस्तकांच्या प्रथम पृष्ठांवर कर्मचाऱ्याची सही नाही.

ड) दि.१२/१/२००१ ते दि.१०/२/२००१ व दि.१०/३/०३ ते ४/९/०४ पर्यंत उपभोगलेल्या सर्व रजेच्या नोंदी साक्षांकित केलेल्या नाहीत.

इ) निलंबन व निलंबनानंतर कामावर रुजू होण्याच्या नोंदी साक्षांकित केलेल्या नाहीत.

## परि.क्र. १०) सेवापुस्तक पडताळणी :- श्री. केशरीनाथ म्हात्रे

श्री. म्हात्रे यांचे सेवापुस्तक व नस्ती तपासली असता खालील बाबी निदर्शनास आल्यात.

अ) व.लिपीक पदाची वेतनानिश्चिती कशी करण्यात आली याचा बोध होत नाही.

ब) दि.२४/१०/७७ ते २७/१०/७७, दि.१/१२/७७ ते १५/१२/७७, दि.२७/३/८८ ते २०/४/८८, दि.५/३/७९ ते ३/४/७९, दि.११/२/८० ते १६/२/८०, दि.१३/४/८१ ते २२/४/८१, दि.१८/३/८३ ते २३/३/८३, दि.३१/१२/८४ ते ५/१/८५, दि.२७/२/८५ ते १/३/८५, दि.१/८/८६ ते ३१/८/८६, दि.४/५/८७ ते २८/५/८७, दि.१०/६/९१ ते ९/७/९१, दि.१६/१/९५ ते १७/१/९५ दि.१६/९/९९ ते १८/९/९९ या कालावधीतील रजा नोंदी साक्षांकित केलेल्या नाहीत.

क) दोन जादा वेतनावाढी कमी केल्याचे व त्याअनुषंगाने वसूली करण्यात आली किंवा कसे? खुलासा करणे आवश्यक आहे.

ड) दि.१/११/२००१ पासून वेतनवाढचा दर चुकीचा आहे.

इ) एल.एस.जी.डी. उत्तीर्ण झाल्याची नोंद साक्षांकित नाही. उत्तीर्ण प्रमाणपत्राची प्रत नस्तीत उपलब्ध नाही.

ई) दि.१/११/२००३ नंतरच्या नोंदीचे सेवापुस्तक उपलब्ध झाले नाही.

परि.क्र. ११) सेवापुस्तक पडताळणी :- श्री. अजित पाटील

श्री. अजित पाटील यांचे सेवापुस्तक व नस्ती तपासली असता खालील बाबी निदर्शनास आल्यात.

श्री. पाटील एल.एस.जी.डी. परीक्षा उत्तीर्ण झाल्याने त्यांना दोन वेतनवाढी मंजूर करण्यात आल्या. तथापि श्री. पाटील, मुख्य लिपीक, पदी असतांना सदरची परीक्षा उत्तीर्ण झाल्याने दोन वेतनवाढी नियमबाहय ठरतात. परिणामी त्यांना दिलेल्या जादा वेतनवाढी रद्द करण्यात येवून वसुली करण्यात यावी.

परि.क्र. १२) सेवापुस्तक पडताळणी :- श्री. स्वप्निल सावंत

श्री. सावंत यांचे सेवापुस्तक व नस्ती तपासली असता खालील बाबी निदर्शनास आल्यात.

अ) दि.१/९/९२, दि.१/९/९४ व दि.१/९/९५ च्या वेतनवाढीच्या नोंदी साक्षांकित नाहीत.

ब) दि.२२/३/२००० ते दि.२७/३/२००२ पर्यंत संप रजा मंजूर केली आहे. तरी या रजेबाबत खुलासा आवश्यक आहे.

क) दि.१/१/२००१ ते ३०/१/२००१ पर्यंतची परिवर्तित रजा साक्षांकित केलेली नाही.

ड) सन २००२ नंतरच्या वेतनवाढीच्या नोंदी नाहीत.

इ) सेवा पडताळणी अभिलेख्यावरुन साक्षांकित केलेली नाही.

ई) एल.एस.जी.डी. व एल.जी.एल. उत्तीर्ण झालेल्या परीक्षेच्या प्रमाणपत्राची प्रत नस्तीत उपलब्ध नाही.

परि. क्र. १३) सेवापुस्तक पडताळणी :- श्री. श्रीकांत मोरे

श्री. मोरे यांचे सेवापुस्तक व नस्ती तपासली असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

अ) दि.२०/१/८८ ते ५/२/८८, दि.१/५/८९ ते ३१/५/८९, दि.२९/४/९१ ते ८/५/९१, दि.११/९/९६ ते ५/१२/९६, दि.१५/५/९६ ते १२/६/९६, दि.७/२/९७ते २४/४/९७,

दि.२५/४/९७ ते ३१/५/९७, दि.१५/५/०४ ते ३१/५/०४, दि.१९/७/०४ ते २२/७/०४ व दि.६/१२/०४ ते ८/१२/०४ या कालावधीच्या रजा साक्षांकित केलेल्या नाहींत.

ब) दि. १/१२/९० रोजीच्या वेतननिश्चिती व दि.१/१२/९१ ची वेतनवाढीची नोंद साक्षांकित नाही. व दि.७/९/९४ पासून निलंबित केल्याची नोंद साक्षांकित नाही.

क) दि.१/१/८९ पासून सेवा पडताळणी वेतन देयकावरुन केलेली नाही.

ड) रजा मंजूरी आदेशाच्या प्रती वैयक्तिक नस्तीमध्ये उपलब्ध नाहीत.

<u>परि.क्र. १४) सेवापुस्तक पडताळणी :- श्रीमती नाताळ रिबेलो.</u>

श्रीमती रिबेलो यांच्या सेवापुस्तकामध्ये दि.२८/११/९४ ते १२/१२/९४, ५/१०/०१ ते १७/१०/०१, दि. २१/१/०२ ते ३१/१/०२, दि. १७/४/०२ ते २०/४/०२, दि.१४/५/०२ ते २४/५/०२ व दि.२१/१०/०२ ते ५/११/०२ या कालावधीतील रजा सक्षम अधिकाऱ्याने साक्षांकित केलेल्या नाहीत. कालबध्द पदोन्नतीची नोंद साक्षांकित नाही. वेतनवाढीच्या नोंदी साक्षांकित नाहीत. गोपनीय अहवालाची प्रत नस्तीमध्ये आढळून आली ही बाब अयोग्य आहे.

<u>परि.क्र. १५) सेवापुस्तक पडताळणी :- श्रीमती समिधा चव्हाण</u>

श्रीमती चव्हाण यांच्या सेवापुस्तकांतील रजेच्या व वेतनवाढीच्या नोंदी सक्षम आधिकाऱ्याने साक्षांकित केल्या नसल्याचे निदर्शनास आले.

<u>परि.क्र. १६) सेवापुस्तक पडताळणी :- श्रीमती अनिता कांबळे</u>

श्रीमती कांबळे यांची नेमणूक दि.१५/३/२००४ रोजी झाली असतानांही अदयाप त्यांच्या सेवापुस्तकात सर्व नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

<u>परि.क्र. १७) सेवापुस्तक पडताळणी :- श्री. गजानन सोमवंशी</u>

श्री. सोमवंशी यांच्या सेवापुस्तकातील रजेच्या नोंदी सक्षम अधिकाऱ्यांने साक्षांकित केलेल्या नाहीत. तसेच सेवापुस्तकावर कर्मचाऱ्यांची स्वाक्षरी नाही.

परि.क्र. १८) सेवापुस्तक पडताळणी :- श्री. देवानंद वनगा

श्री. वनगा यांचे सेवापुस्तकातील रजेच्या नोंदी व वेतनवाढी साक्षांकित केलेल्या नाहीत. सेवापुस्तकावर कर्मचाऱ्याची स्वाक्षरी नाही.

परि.क्र. १९) सेवापुस्तक पडताळणी :- श्री. संजय गोखले

श्री. गोखले यांच्या सेवापुस्तकातील दि.१/१२/९९ पासूनच्या वेतनवाढी साक्षांकित नाहीत. दि.१/१२/९७ला जकात निरीक्षक पदावरील पदोन्नतीची नोंद व चौथ्या वेतन आयोगाची नोंद साक्षांकित नाही.

परि.क्र. २०) सेवापुस्तक पडताळणी :- श्री. मोरेश्वर पहुरकर

श्री. पहुरकी यांच्या सेवापुस्तकातील रजा, वेतनवाढी व पदोन्नतीच्या नोंदी साक्षांकित केलेल्या नाहीत.

परि.क्र. २१) सेवापुस्तक पडताळणी :- श्रीमती. गंभीरराव

श्रीमती गंभीरराव यांच्या सेवापुस्तकातील दि.१/६/०४ ते दि.११/६/०४ या कालावधीची रजा साक्षांकित केलेली नाही. दि.१/४/२००१ पासून सेवा पडताळणी प्रमाणित केली नाही. आस्थापना शाखेत वैयक्तिक नस्ती उपलब्ध झाली नाही.

परि.क्र. २२) सेवापुस्तक पडताळणी :- श्री. बाबुराव वाघ

श्री. वाघ यांच्या सेवापुस्तकामध्ये दि.२९/१०/२००१ पासुनची रजा, रजाखात्यामध्ये खर्ची घालण्यात आलेली नाही. सेवा पडताळणी प्रमाणित केलेली नाही.

परि.क्र. २३) सेवापुस्तक पडताळणी :- श्री. चंद्रकांत बोरसे.

श्री. बोरसे यांच्या सेवापुस्तकामध्ये दि.१/७/०४ ते ५/७/०४ या कालावधीचा रजा कालावधी तसेच पदोन्नतीची नोंद साक्षांकित केलेली नाही.

परि.क्र. २४) सेवापुस्तक पडताळणी :- श्री. दादासाहेब खेत्रे

श्री. खेत्रे यांचे सेवापुस्तकामध्ये रजा साक्षांकित नाहीत. एल.एस्.जी.डी. परीक्षा उत्तीर्ण झाल्याने दिलेल्या वेतनवाढी साक्षांकित नाहीत. सेवापुस्तकावर कर्मचाऱ्याची स्वाक्षरी नाही.

परि.क्र. २५) सेवापुस्तक पडताळणी :- श्री. आर.डी. आसोदेकर

श्री. आसोदेकर यांच्या सेवापुस्तकामध्ये वेतनवाढ साक्षांकित नाही. सेवापुस्तकावर कर्मचाऱ्याची स्वाक्षरी नाही. सन १९९८ पासून सेवा पडताळणी प्रामाणित केलेली नाही.

परि.क्र. २६) सेवापुस्तक पडताळणी :- श्री. वसंत राणे

श्री. राणे यांच्या सेवापुस्तकामध्ये दि.५/२/०४ ते २९/२/०४ या कालावधीची रजा साक्षांकित केलेली नाही. वेतनवाढ साक्षांकित केलेली नाही.

परि.क्र. २७) सेवापुस्तक पडताळणी :- श्रीमती. मंजिरी डिमेलो

श्रीमती डिमेलो यांच्या सेवापुस्तकामध्ये दि.२३/२/९३ ते २६/२/९३, दि.१३/६/२००० ते ३०/६/२०००, दि.१/७/२००० ते २१/७/२०००, दि.२३/१२/०२ ते २७/१२/०२, दि.२७/५/२००२ ते १/६/०२ व दि.१/१०/०२ ते ११/१०/०२ या कालावधीच्या रजा साक्षांकित नाहीत. एल.एस.जी.डी. परीक्षा उत्तीर्ण झाल्याने दिलेल्या वेतनवाढी साक्षांकित नाही.

परि.क्र. २८) सेवापुस्तक पडताळणी :- श्री. सुधीर सावंत

श्री. सावंत यांच्या सेवापुस्तकामध्ये दि.१६/३/९० ते २३/३/९० व दि.२९/४/९१ ते १०/५/९१ या कालावधीच्या रजा साक्षांकीत नाहीत. एल.एस.डी.जी परीक्षा सन १९९० मध्ये उत्तीर्ण झाले असतानांही व.लिपीक पदी पदोन्नती दि.१/१२/८८ ला देण्यात आली आहे. तरी याबाबत खुलासा आवश्यक आहे. तसेच वैयक्ति नस्तीमध्ये रजेचे अर्ज व परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या प्रमाणपत्राची प्रत उपलब्ध नाही.

**परि.क्र. २९) सेवापुस्तक पडताळणी :- श्री. गोविंद परब**

श्री. परब यांच्या सेवापुस्तकामध्ये दि.१४/९/८८ ते २२/९/८८, दि.२०/६/८९ ते २३/६/८९, दि.१७/८/९० ते ३१/८/९० व दि.२६/१२/२००० ते २०/१/२००१ या कालावधीच्या रजा साक्षांकित नाहीत. सन १९९२,९३ व २००१ मधील वेतनवाढी साक्षांकित नाहीत.

**परि.क्र. ३०) सेवापुस्तक पडताळणी :- श्री. सुनील यादव**

श्री. यादव यांच्या सेवापुस्तकामध्ये दि.२६/५/०३ ते ३१/५/०३, दि.१/९/०३ ते ४/९/०३, दि.१०/६/०४ ते १८/६/०४ व दि.७/९/०२ ते २६/९/०२ या कालावधीतील रजा साक्षांकित नाही. तसेच दि.२२/३/२००० ते २७/३/२००० पर्यंतच्या संप रजेबाबत खुलासा आवश्यक आहे. सन १९९६ व ९७ मधील वेतनवाढी साक्षांकित नाहीत.

**परि.क्र. ३१) सेवापुस्तक पडताळणी :- श्री. मनोहर म्हात्रे**

श्री. म्हात्रे यांना दि.१/१२/८८ पासून वरिष्ठ लिपीक पदी पदोन्नती दिली असल्याने एल.एस.जी.डी. परीक्षा उत्तीर्ण झाल्याने दिलेल्या दोन वेतनवाढी नियमबाहय ठरतात. त्यामुळे त्या रद्द करण्यात येवून वसुली करण्यात यावी. सदरची परीक्षा उत्तीर्ण होण्यापूर्वीच पदोन्नती कशी देण्यात आली याचाही खुलासा करण्यात यावा. दि.१/१२/२००३ ची वेतनवाढीची नोंद साक्षांकित नाही. तसेच त्यापुढील वेतनवाढीच्या नोंदी सेवापुस्तकामध्ये घेण्यात आल्या नाहीत. रजा साक्षांकित केलेल्या नाहीत.

**परि.क्र. ३२) सेवापुस्तक पडताळणी :- श्री. नरेंद्र पाटील**

श्री. पाटील यांच्या सेवापुस्तकामध्ये रजा साक्षांकित केल्या नाहीत. चौथ्या वेतन आयोगाची नोंद साक्षांकित नाही. सन १९८८ ते १९९२ पर्यंत वेतनवाढीच्या नोंदी नाहीत. सन १९९३ ची वेतनवाढ साक्षांकित नाही. एल.एस.जी.डी. परीक्षा उत्तीर्ण झाल्याची नोंद सेवापुस्तकामध्ये नाही.

परि.क्र. ३३) सेवापुस्तक पडताळणी :- श्री. हेमंत पाटील

श्री. पाटील यांच्या सेवापुस्तकातील रजेच्या नोंदी सक्षम अधिकाऱ्याने साक्षांकित केलेल्या नाहीत. पदोन्नतीची नोंद साक्षांकित नाही. निलंबनानंतर परत कामावर घेतल्याची नोंद साक्षांकित नाही. नस्ती उपलब्ध न झाल्याने एल.एस.जी.डी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र पाहता आले नाही.

परि.क्र. ३४) सेवापुस्तक पडताळणी :- श्री. संजय तायशेटे

श्री. तायशेटे यांना दि.१/१२/८८ ला व. लिपिक पदी पदोन्नती दिली असल्याने त्यापुढील काळात (जाने.८९)एल.एस.जी.डी. परीक्षा उत्तीर्ण झाल्याने त्यांना देण्यात आलेल्या दोन वेतनवाढी नियमबाहय ठरतात. सबब त्या वेतनवाढी रद्द करण्यात येवून वसूली करण्यात यावी. तसेच एल.एस.जी.डी. परीक्षा उत्तीर्ण होण्यापूर्वी पदोन्नती कशी देण्यात आली. याचा खुलासाही करणे आवश्यक आहे. दि.१/१२/२००४ ची वेतनवाढ साक्षांकित केलेली नाही. रजा साक्षांकित केलेल्या नाहीत.

परि.क्र. ३५) सेवापुस्तक पडताळणी :- श्री. सुनिल ज. काळे

श्री. काळे कोणत्या वर्षी एल.एस.जी.डी. परीक्षा उत्तीर्ण झाले याची नोंद नसल्याने त्यांचा सन १९८८ मधील पदोन्नती उत्तीर्ण झाल्यावर दिली की अगोदर दिली याचा बोध होत नाही. श्री. काळे यांची नस्ती उपलब्ध न झाल्याने तपासता आले नाही. श्री. काळे जर पदोन्नतीच्या दिनांकानंतर उत्तीर्ण झाले असतील तर त्यांना जर दोन वेतनवाढी दिल्या असतील तर त्या नियमबाहय ठरत असल्याने वसुली करण्यात यावी. तसेच जर पदोन्नती परीक्षा उत्तीर्ण होण्यापूर्वी देण्यात आली असेल तर कशी देण्यात आली यांचा खुलासा होणे आवश्यक आहे. श्री. काळे यांच्या सेवापुस्तकातील रजा साक्षांकित केलेल्या नाहीत.

परि.क्र. ३६) सेवापुस्तक पडताळणी :- श्री. अविनाश जाधव

श्री. जाधव यांच्या सेवापुस्तकातील रजा साक्षांकित केलेल्या नाहीत. तसेच दि.१/१२/९३ व दि.१/१२/९४ च्या वेतनवाढी साक्षांकित केलेल्या नाहीत. एल.जी.एस. परीक्षा उत्तीर्ण झाल्याची नोंद साक्षांकित नाही.

परि.क्र. ३७) सेवापुस्तक पडताळणी :- श्री. वासुदेव शिरवलकर

श्री. शिरवलकर यांच्या सेवापुस्तकामध्ये दि.१५/३/९० ते ९२ पर्यंतच्या वेतनवाढी साक्षांकित नाही. दि.१/३/०४ ची पदोन्नतीची नोंद साक्षांकित नाही. रजेच्या नोंदी साक्षांकित नाहीत.

परि.क्र. ३८) सेवापुस्तक पडताळणी :- श्री. सुदाम गोडसे

श्री. गोडसे यांची नेमणूकीची नोंद साक्षांकित नाही. दि.१/१२/९२ ते १/१२/२००४ पर्यंतच्या वेतनवाढीच्या नोंदी साक्षांकित नाहीत. रजेच्या नोंदी साक्षांकित नाहीत. वैयक्तिक नस्ती उपलब्ध झाली नाही.

परि.क्र. ३९) सेवापुस्तक पडताळणी :- श्री. संजय दोंदे

श्री. दोंदे यांच्या सेवापुस्तकाध्ये दि.१/५/९६ ते १/५/२००० पर्यंतच्या वेतनवाढीच्या नोंदी साक्षांकित नाही. वेतन निश्चितीची नोंद साक्षांकित नाही. दि.१/९/२००१ ते १/९/२००४ पर्यंतच्या वेतनवाढीच्या नोंदी साक्षांकित नाहीत. रजेच्या नोंदी साक्षांकित नाहीत.

परि.क्र. ४०) सेवापुस्तक पडताळणी :- श्री. नरेंद्र चव्हाण

श्री. चव्हाण यांची दि.२/९/९१ ची नेमणूकीची नोंद साक्षांकित नाही. सेवापुस्तकाच्या प्रथम पृष्ठावर कर्मचाऱ्याची सही नाही. दि.१/९/९२ ते १/९/२००३

पर्यंतच्या वेतनवाढीच्या नोंदी साक्षांकित नाहीत. दि.१०/११/९८ते दि.२०/११/९८ या कालावधीच्या रजा साक्षांकित नाहीत.

परि.क्र. ४१) सेवापुस्तक पडताळणी :- श्री. जनार्दन भासे

श्री. भासे यांचे सेवापुस्तकातील रजा साक्षांकित नाही. दि.१/५/८९, दि.१/५/९४ ते दि.१/५/९६ व दि.१/४/९८ ते १/४/२००४ पर्यंतच्या वेतनवाढीच्या नोंदी साक्षांकित नाहीत. सेवापुस्तकामध्ये विभागीय परीक्षा उत्तीर्ण झाल्याची नोंद नाही.

परि.क्र. ४२) सेवापुस्तक पडताळणी :- श्री. लहू चौधरी

श्री. चौधरी यांच्या सेवापुस्तकामधील रजेच्या नोंदी साक्षांकित केलेल्या नाहीत. दि.१/५/९६ ते १/५/२००४ पर्यंतच्या वेतनवाढीच्या नोंदी साक्षांकित नाहीत. सेवा पडताळणी प्रमाणित केलेली नाही.

परि.क्र. ४३) सेवापुस्तक पडताळणी :- श्री. जगदीश भोपतराव

श्री. भोपतराव यांच्या सेवापुस्तकातील रजेच्या नोंदी साक्षांकित नाही. दि.१/५/९६ ते १/५/२००० व दि.१/९/२००३ ते दि.१/९/२००५ पर्यंतच्या वेतनवाढीच्या नोंदी साक्षांकित नाहीत. सेवापडताळणी प्रमाणित केलेली नाही.

परि.क्र. ४४) सेवापुस्तक पडताळणी :- श्री. दशरथ हंडोरे

श्री. हंडोरे यांच्या सेवापुस्तकातील दि.१/२/९६ ते १/६/२००५ पर्यंतच्या वेतनवाढीच्या नोंदी साक्षांकित केलेल्या नाहीत. दि.२९/६/२००० ते २९/७/२००० पर्यंतची परिवर्तित रजेची नोंद साक्षांकित नाही. सेवा पडताळणी प्रमाणित केलेली नाही.

**परि.क्र. ४५) सेवापुस्तक पडताळणी :- श्री. हसमुख सोनी**

श्री. सोनी यांची सेवापुस्तकामध्ये स्वाक्षरी नाही. दि.१/१/९२ व दि.१/९/०४ च्या वेतनवाढ नोंदी साक्षांकित नाहीत. रजा साक्षांकित नाहीत. सेवा पडताळणी प्रमाणित केलेली नाही.

**परि.क्र. ४६) सेवापुस्तक पडताळणी :- श्रीमती. अन्नपूर्णा आवडेकर**

श्रीमती आवडेकर यांची सेवापुस्तकाच्या प्रथम पृष्ठावर स्वाक्षरी नाही. दि.१/५/९६ ते दि.१/९/२००२ व दि.१/९/२००४ ते दि.१/९/२००५ च्या वेतनवाढ नोंदी साक्षांकित नाहीत. सन २००१ नंतरची सेवा पडताळणी प्रमाणित केलेली नाही.

आपल्या कार्यालयामध्ये अशाच प्रकारची अनियमितता असलेली इतर कर्मचाऱ्यांची सेवापुस्तके तपासणी करुन अदययावत करण्यात यावी व तसे प्रमाणित करणे आवश्यक आहे.

**परि.क्र. ४७) वेतन देयकातील अनियमितता:-**

वेतन देयकांची तपासणी करतांना असे निदर्शनास आले की, आस्थापना विभागाकडून विवक्षित महिन्याचे वेतन काढतांना मागील महिन्यातील पंधरा दिवसांचे व चालु महिन्यातील अर्ध्या कालावधीचे वेतन काढण्यात येते ही बाब अयोग्या आहे. कारण कर्मचाऱ्यांचे वेतन काढतांना ते त्या विवक्षित महिन्याचे काढण्यात येत असते. वेतन देयकासोबत, त्या विवक्षित महिन्यांत ज्यांना वार्षिक वेतनवाढ देण्यात आली आहे. त्यांचे बाबतीत वेतनवाढ प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. यापूर्वीही असा आक्षेप असून त्याची पूर्तता केलेली नाही.

**परि.क्र. ४८) नामनिर्देशन पत्राबाबत:-**

मनपा मधील कर्मचाऱ्यांची सेवापुस्तके व वैयक्तिक नस्तींची तपासणीचे वेळी निदर्शनास आले की, कर्मचाऱ्यांकडून सेवा मृत्यू उपदान व भविष्य निर्वाह निधीची

नामनिर्देशन पत्रे भरुन सेवापुस्तकामध्ये चिकटवण्यात आलेली नाहीत. त्यामुळे कर्मचाऱ्याच्या मृत्यूप्रकरणी त्याच्या पश्चात वारसांना देणी देतांना अडचणी निर्माण होतात. सेवापुस्तकामधील जन्मतारीख व स्वास्थ प्रमाणपत्राच्या नोंदी सक्षम अधिकाऱ्याने साक्षांकित करुन प्रमाणीत होणे आवश्यक आहे.

**परि.क्र. ४९) भविष्य निर्वाह निधीबाबत:-**

कर्मचाऱ्यांचे भाविष्य निर्वाह निधीचे लेखे वित्तीय वर्षाच्या शेवटी व्याजाची परिगणना करुन सक्षम अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीने बंद करण्यात येवून प्रत्येक कर्मचाऱ्यास वर्षाच्या शेवटी लेखा विवरणपत्र देणे आवश्यक आहे.

सध्या शासन निर्णायाप्रमाणे मनपा कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधीवरील रक्कमेवर ८ टक्के व्याज देण्यात येत आहे. परंतु कर्मचाऱ्यांची रक्कम बँकेमध्ये गुंतवणूक केल्यावर जवळपास ५.५० टक्के व्याज प्राप्त होत असल्याने मनपास तोटा होत आहे. तरी मनपास तोटा होवू नये यासाठी वेळीच उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**परि.क्र. ५०) भविष्य निर्वाह निधी लेख्यांचे ताळमेळपत्रक:-**

दि.३१/३/२००५ रोजी भविष्य निर्वाह निधी दैनिक पुस्तकामध्ये (नमुना क्र.१००) खालीलप्रमाणे शिल्लका दर्शविण्यात आल्या आहेत.

| | |
|---|---|
| स्टेट बँक ऑफ इंडिया | रु. १८,३५,८७२.४० |
| डाक कार्यालय | रु. ३,०९०.०० |
| एफ.डी.आर. | रु.२,७४,३२,५३८.०० |
| पोस्ट मुदत ठेवी | रु. ५१,००,०००.०० |

परंतु स्टेट बँकेकडील बचत खाते क्र.१०२५४४२१३९० मध्ये दि.३१/३/२००५ रोजी रु.१४,७९,४२९.४०/- एवढी शिल्लक आहे. तरी दोहोमधील फरक रु.३,५६,४४३/- चा ताळमेळ लावून ताळमेळपत्रक बनविणे आवश्यक आहे.

तसेच लेखा शाखेकडील गुंतवणूक नोंदवहीप्रमाणे एफ.डी.आर. मध्ये रु.३,५०,७१,७६८/- व पोस्ट मुदत ठेवीमध्ये रु.७८,००,०००/- ची गुंतवणुक केल्याचे

दिसते. त्यामुळे उपरोक्त दर्शविण्यात आलेल्या गुंतवणूकी व प्रत्यक्ष लेखा शाखेने केलेल्या गुंतवणूकीमध्ये तफावत आहे. तरी या तफावतीचा शोध घेणेही आवश्यक आहे.

दैनिक पुस्तकामध्ये डाक कार्यालयाच्या नावे दर्शविण्यात आलेली रक्कम रु.३,०९०/- च्या गुंतवणूकीचे अभिलेखांचा शोध घेणे आवश्यक आहे.

<u>परि.क्र. ५१) अतिक्रमण विभाग:- अनधिकृत बांधकामे तोडण्याचे चार्जेस वसुलीबाबत.</u>

एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ नुसार अनधिकृत बांधकामे तोडण्यासाठी महानगरपालिकेचा झालेला खर्च संबंधिताकडून वसूल करणे आवश्यक आहे. परंतु असे निदर्शनास आले की, अतिक्रमण विभागने अद्यापपर्यंत सदरचा खर्च संबंधितांकडून वसूल केलेला नाही.

तसेच उपरोक्त अधिनियमातील कलम १२४(क) नुसार अतिक्रमण विभागाने अनधिकृत बांधकामे पाडून अथवा अशा प्रकरणी दोषींना नोटीस दिल्याचे अभिलेख शाखेकडे उपलब्ध नाहीत.

म्हणजेच अतिक्रमण विभागाने अनधिकृत बांधकामे पाडण्यावर झालेला खर्च आजपर्यंत वसुल केलेला नाही. त्यामुळे मनपाचा महसूल बुडत आहे.

<u>परि.क्र. ५२) जकात विभाग:- कंत्राटदाराकडून दंडाची रक्कम वसुल होणेबाबत.</u>

सन २००४-०५ या वित्तीय वर्षामध्ये दि.१७/५/०३ दि.१६/५/०४ पर्यंत व पुढे न्यायालयाच्या आदेशानुसार दि.२२/६/०४ पर्यंत मे. सहकार एजन्सी यांना रु.२९,०७,९९,९९९/- एवढया रक्कमेचे जकात वसुलीचे कत्राट देण्यात आले होते. व तद्नंतर दि.२३/६/०४ पासून दि.२२/६/०५ पर्यंत रु.३६,२७,००,०००/- एवढया रक्कमेचे जकात वसुलीचे कंत्राट मे. कोर्णाक इन्फ्रा. एजन्सी यांना दिले आहे.

परंतु मे. सहकार एजन्सीने अटीशर्थीनुसार जकात वसुलीचा हप्ता रोखीने न भरता धनादेशाने भरल्याने धनादेश वटण्यासाठी झालेल्या विलंबामुळे त्यांचेकडून रु.४६,०३९/- दंडाची वसुली होणे आवश्यक आहे. तसेच मे. कोर्णाक इन्फ्रा. एजन्सीने करारनाम्यातील अटीशर्थीनुसार जकात हप्त्याची रक्कम वेळेत मनपामध्ये न भरल्यामुळे त्यांचेकडून

दि.२२/६/०५ पर्यंत दंडाची रक्कम रु.२,०८,३५२/- वसुल करणे आवश्यक आहे. तसेच उक्त कंत्राटदराने शेवटच्या हप्त्यातील रक्कम रु.२८,३८,३७७/- अद्याप सुध्दा भरली नसल्याने सदरची रक्कम व्याजासह तात्काळ वसुल करणे आवश्यक आहे.

परि.क्र. ५३) भांडार विभाग:- कार्यप्रणालीबाबत.

भांडार विभागाचे दरवर्षी कार्यालयास लागणारी लेखनसामग्री व वस्तूंची खरेदी विहित मार्गाने दर करार करुन मनापातील विविध विभागांना आवश्यकतेनुसार पुरविणे आवश्यक आहे. दि.२५/१०/०४ रोजी भांडार विभागाकडे प्राप्त झालेले ५० नग फॅक्स मशिन रोलचा संपूर्ण साठा आयुक्त दालनाकडे देण्यात आला आहे हे योग्य नाही. आपल्या विभागातील वस्तूंचा साठा आवश्यकतेनुसार पुरवठा करण्यात यावा. याबाबत खुलासा करणे आवश्यक आहे.

भांडार विभागकडून खरेदी करण्यात येणाऱ्या अंगम मालमत्तेवर क्रमांक नोंदवण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे. वास्तविक भांडार विभागाने खरेदी केलेली जंगम मालमत्तेवर क्रमांक नोंदवूनच दुसऱ्या विभागांकडे वर्ग करणे आवश्यक आहे.

भांडार पडताळणीचे वेळी असे निदर्शनास आले की, झेरॉक्स पेपरचा साठा दि.२६/८/०५ रोजी साठावहीप्रमाणे संपलेला असतानाही त्याचा पुरवठा त्यापुढेही वेळोवेळी सुरुच होता. तरी त्याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र.१५६ नुसार मालमत्तेची वार्षिक पडताळणी करुन तसे केल्याचे प्रमाणित करणे आवश्यक आहे. घसारा नोंदवही ठेवण्यात येवून मत्तेची सन २००४-०५ या वित्तीय वर्ष अखेरची किंमत काढणे आवश्यक आहे.

भांडार पडताळणीचे वेळी असेही निदर्शनास आले की, मनपामधील इतर विभागांना लेखनसामग्री देतांना त्या विभागाकडून मागणी पत्र घेण्यात येत नाही. तसेच लेखनसामग्री दिल्यावर बऱ्याच प्रकरणी स्वाक्षरी सुध्दा घेण्यात येत नाही. ही बाब योग्य नाही. आंतरविभागीय स्थानातंरणे करतांना लेखासंहितेतील नियम क्र.१४२(२) अन्वये कार्यवाही होणे आवश्यक आहे.

परि.क्र. ५४) अग्निशमन विभाग:- पायाभूत सुविधा

मनपा क्षेत्राचा विस्तार व लोकसंख्या विचारात घेतली असता मनपा क्षेत्रामध्ये जवळपास चार केंद्रे कार्यरत असणे आवश्यक आहे. जेणेकरुन वेळप्रसंगी अग्निशमन वाहन कमीत कमी वेळेत जागेवर पोचू शकेल. तसेच त्या प्रमाणात कर्मचारी वर्ग व वाहनांची संख्या सुध्दा वाढविणे आवश्यक आहे.

नॅशलन. बिल्डिंग कोड ऑफ इंडिया १९८३ प्रमाणे १५ मीटर किंवा त्यावरील उंचीच्या इमारतींना उंच इमारती समजण्यात येत असल्याने कॅपिटेशन फी ची आकारणी १५ मीटरच्या उंचीच्या इमारतीपासून केल्यास मनपाचे उत्पन्न वाढू शकते. तसेच उंच इमारती बांधण्याची परवानगी देतांना सदरची प्रकरणे अग्निशमन विभागाकडून छाननीसाठी पाठविल्यास इमारत बांधणीचे वेळीच त्यामध्ये अग्निशमनासाठी आवश्यक सुविधा निर्माण करता येईल.

मनपा क्षेत्रामध्ये सध्या अस्तित्वात असलेल्या १५ मीटर पेक्षा उंचीच्या इमारतींचा आढावा घेणे आवश्यक आहे.

कर विभाग

परि.क्र. ५५) आय वॉर्ड विभागाची कर आकारणी प्रकरणांमधील अनियमितता

१) सुरेश रा. म्हात्रे/बलवंत पाटील/करारनामा रजिस्ट्रेशन नाही. अर्जदाराच्या अर्जानुसार २००३/०४ पासुन कर आकारणी होणे आवश्यक आहे.

२) प्यारी देवी रतनलाल तेली घरपट्टीची विभागणी करताना करारनामा जोडलेला नाही.

३) कमलाकार गणपत पाटील कर आकारणीसाठी अर्जाव्यतिरिक्त कोणतेही कागदपत्रे जोडलेली नाहीत. जागाक्षेत्र समजून येत नाही.

४) गोपीनाथ बी. झा- केबीन क्रॉस रोड- सन २००३/०४ या सालातील दर हा १.६० पैसे असताना कर आकारणी ०.५० पैसे प्रमाणे केलेली आहे. मा. आयुक्तांचे आदेश, मा. स्थायी समिती ठराव व इतर कागदपत्रे जोडण्यांत यावेत.

५) मनोहर शिनवार पाटील श्रीम. शशीकला हरेश्वर पाटील एस/१ नर्मदा इंडस्ट्रियल इंस्टेट भाईंदर (पूर्व) कर आकारणी विभागून देताना रु.७७ कमी आकारणी दाखविलेली आहे. (सन २००४/०५)

६) रेलव्हयू या इमारतीमधील एस/८ चे अॅग्रीमेंट नाही. त्यामुळे जागाक्षेत्र समजून येत नाही. तसेच २/३ चा करारनामा ११५/८२ चा असताना सन २००४/०५ मध्ये आकारणी केली आहे.

७) समरशेट को.ऑ.हौ. सोसायटीचे कर निर्धारण प्रकरणामध्ये मालमत्ता मालक मालमत्ता धारण केल्याचे वर्ष व त्यांच्या करारनाम्यांची शहनिशा होणे आवश्यक आहे.

८) लवडेल को.ऑ.हौ. सोसायटीमधील कर आकारणी न केलेल्या सदस्यांच्या बाबतीत मालमत्तेचा करारनामा १९९३/९४ या वर्षातील आहे. परंतु कर आकारणी सन २००४-०५ या वर्षापासुन करण्यांत येत आहे. तरी खुलासा आवश्यक आहे.

<u>परि.क्र. ५६) एफ वॉर्ड व जे वॉर्डातील कर आकरणी प्रकणांमधील अनियमितता</u>

१) कमल मंगलदास वाघेला अशोका शॉ.सें. २१/२२/२३ नवघर जागाक्षेत्र चुकीचे घेतलेले आहे. जर कार्पेट केले असल्यास तसे सर्टीफीकेटस् जोडणे आवश्यक आहे.

२) रामदेव कस्ट्रक्शन कं.प्रा.लि., एस्.व्ही. रोड, भाईंदर (पूर्व) कर आकरणीसाठी अर्ज नाही. अॅग्रीमेंट नाही. त्यामुळे जागाक्षेत्राची पडताळणी करता येत नाही.

३) एस्.पी. इंटरप्रायजेंस करारनामा नाही रुम नं. ३१०,४०३,४०४,४०७,४०९, ४१०,२०२,२०४ ते २०७,२०९,२१०,३०३,३०५, ४ ते ८, १०१,१०२,१०३,१०८ यांचे रजिस्ट्रेशन नाही. करारनामा नाही.

४) मयुर कंस्ट्रकशन कं. करारनामा नाही. रजिस्ट्रेशन नाही. त्यामुळे जागाक्षेत्र समजून येत नाही.

५) नोव्हेल फ्रांन्सीस झोलार व इतर यांची १ ते ४ जे घरे कोळीनगर येथील आहेत. तो भाग झोपडपट्टीत मोडत नाही असे असताना दर झोपडपट्टीचा लावलेला आहे. ९५ पुर्वीची झोपडी आहे असे पुरावे कागदपत्रे जोडलेले नाहीत.

६) कुसुम बिल्डर्स आणि डेव्हलपर्स फ्लॅट नं.३ च्या करारनाम्यामध्ये खाडाखोड केलेली आहे. जागाक्षेत्र समजून येत नाही. स्टेटमेंटमध्ये मालकाचे नावाची जागा रिक्त सोडलेली आहे. आर्कीटेक्टचे सर्टिफिकेट नाही.

७) सीव्हयू कॉम्पे. संतरादेवी एस् मीना एच/१५८२३ हया शॉप ची सुधारीत केलेली आकारणीस अर्ज मान्यता व इतर कागदपत्रे नाहीत.

८) मिग कॉम्लेक्स अे/२ काशीमीरा रोड ॲग्रीमेंटचे फक्त पहिलेच पानाची झेरॉक्स असल्याने जागाक्षेत्र व करारनामा तारीख समजून येत नाही.

९) मे. आर.सी.अेव्हेन्यू, गोडदेव स्टेटमेंटला व्हाईटइंक लावून खाडाखोड केलेली आहे. करारनामा नाही. जागाक्षेत्र समजून येत नाही.

१०) टिकाराम धजगी चौधरी स्टर्लिंग सिटी रोहाउस नं. १, ॲग्रीमेंटमधील एरिआ जादा आहे. जागाक्षेत्र ९६० दाखविलेले आहे. आर्किटेक्ट सर्टी. जोडलेले नाही.

११) दिपक एस् भोपटे करारनामा १९८५ चा आहे. एवढी वर्षे कर आकारणी झालेली नाही. खुलासा मागविणे योग्य वाटते.

१२) संतलाल नेदुर पटेल/अशोक शेट्टी जागाक्षेत्राबाबत मनपा इंजि. यांच्याकडून सर्टिफिकेटस् घेणे आवश्यक वाटते.

१३) मे. जयेश इंटरप्रायजेस काशीमिरा रोड भाईंदर (पूर्व) ज्यूपीटर बी जागेबाबत कागदपत्रे नाहीत. जागाक्षेत्र समजून येत नाही. मालकाचे नांव जागा रिकामी सोडलेली आहे. हे बरोबर नाही. कर निर्धारक व संकलक यांची स्टेटमेंटवर सही शिक्का नाही.

१४) सायलेंट पार्क गोडदेव जागाक्षेत्र पडताळून पहाता येत नाही त्याबाबतची कागदपत्रे नाहीत.

१५) निकिशा पॅलेस अे/बी दिलीप शाह ॲण्ड असो. रामदेव पार्क रोड जागाक्षेत्राची कागदपत्रे नाहीत.

१६) मे. डिफोडील अे/बी विंग क्यून्स पार्क काशीमिरा रोड जागाक्षेत्राची कागदपत्रे नाहीत करारनामा नाही.

१७) मिग कॉम्लेक्स बी/१ काशीमिरा रोड आर्कीटेक्ट सर्टीफीकेटस् आहे. परंतु कार्पेट एरियाचा उल्लेख नाही.

१८) मिग कॉम्लेक्स अे/१ काशीमिरा रोड, जागाक्षेत्र समजून येत नाही. करारनामा नाही. आर्कीटेक्ट सर्टीफीकेट नाही.

**परि.क्र. ५७) राईमुर्धे व R विभागातील कर आकारणी प्रकरणांमधील अनियमितता**

१) श्री केसरीनाथ हरी पाटील

जुनी मालमत्ता तोडून नविन बांधकामे केलेली आहेत. जुने क्षेत्रफळ समजून येत नाही. मालकी हक्कांचे कागदपत्रे नाहीत. वाढीव बांधकाम असल्यास नविन दर (चालू दर) लावणे आवश्यक आहे.

२) श्री. मनोहर दामोदर भोईर, मुर्धागांव

वाढीव बांधकाम आहे. जुने बांधकाम किती हे समजून येत नाही. जुनी आकारणी तशीच आहे की रद्द केली किंवा कसे याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

३) श्री. बबन भिमाजी पाटील, राई शिवनेरी, जागेचा नोटरीकृत करारनामा आहे. नविन बांधकाम आहे हे समजून येत नाही. बांधकामाचे पेपर जोडलेले नाहीत.

४) श्रीम. भागुनाई रमेश हडपती रेवा आगार जुनी मालमत्ता तोडून नविन मालमत्ता आहे. जुनी आकारणी समजून येत नाही. त्यामुळे वाढीव बांधकाम समजून येत नाही.

५) श्री. पुरुषोत्तम छनिया माछी, राईबाग मालकी हक्कांचे कागदपत्रे नाहीत. वाढीव बांधकाम आहे.

६) सौ. प्रसन्ना नंदकिशोर राउत

वाढीव बांधकाम आहे. परवानगी नाही जुने क्षेत्रफळ नविन क्षेत्रफळ समजून येत नाही. सन १९९७ ची कर भरणा पावती जोडलेली आहे. ९७ नंतर कर भरणा केलेला दिसुन येत नाही.

७) श्रीम. मथुराबाई रमेश हडपती रेवा आगार जुनी मालमत्ता आहे. वाढीव बांधकाम आहे. कागदपत्रे नाहीत. सन २००० नंतर कर भरणा केलेला दिसुन येत नाही.

८) श्रीम. गोदाबाई भास्कर पाटील, राई

१९९५ पुर्वीचे घर असताना हया अगोदर कर आकारणी का करण्यांत आली नाही? खुलासा मागविणे योग्य

९) श्री. लक्ष्मीदास मनू माछी, मोर्वा भाटी सन १९९५ पुर्वीपासून रहात असताना हया अगोदर कर आकारणी का केलेली नाही? खुलासा मागविणे योग्य वाटते.

१०) श्री. देवू एवू गावडे

१९९५ पुर्वीपासुन रहात असमाना हया अगोदर कर आकारणी का झालेली नाही? खुलासा मागविणे योग्य.

## परि.क्र. ५८) काशी विभागातील कर आकारणी प्रकरणांमधील अनिमितता

एकूण आठ प्रकरणे तपासणीसाठी आलेली होती. त्यातील दोन प्रकरणास आवश्यक कागदपत्रे जोडलेली आहेत. सहा प्रकरणामध्ये तृटी आहेत ती खालीलप्रमाणे

१) मे. नाझ बरकत अली डोसानी व इतर ॲग्रीमेंटच्या सालापासुन कर आकारणी आवश्यक आहे.

२) संजय बोणा वाझ यांच्या घराला केलेल्या कर आकारणीमध्ये जागामोजमाप घेतलेला अहवाल नाही.

३) अर्जुन के. लाला व इतर-४ करारनामा नाही. त्यामुळे जागाक्षेत्र समजून येत नाही. स्वयंस्पष्ट अहवाल नाही. निरिक्षकांचा अहवाल नाही.

४) साईबाबा नगर-सी निरिक्षकाचा अहवाल नाही. कर निर्धारक व संकलक यांचा अहवाल स्पष्ट नाही. करारनामा रजिस्टर नाही

५) साईबाबा नगर-डी कर निरिक्षक कर संकलक यांचा अहवाल स्वयंस्पष्ट नाही. करारनामा रजिस्टर नाही.

६) जयनगर निरिक्षकाचा अहवाल स्पष्ट नाही. जागा मोजमाप घेतलेले नाही. करारनामा रजिस्टर नाही.

<u>परि.क्र. ५९) वॉर्ड क्र. के. व मिरा मधील कर आकारणीतील अनियमितता</u>

१) दिनेश कंन्स्ट्रक्शन कं. शालीभद्र बि.नं.३

सदर आकारणीमध्ये करारनामा नाही. त्यामुळे जागाक्षेत्र समजून येत नाही. निरीक्षक, अधिक्षक यांचा अहवाल नाही. अर्ज नाही.

२) शालीभद्रग्राम बिल्डींग नं. ४

अर्ज नाही. करारनामा नाही. त्यामुळे जागाक्षेत्र पडताळणी करता येत नाही. कर निरिक्षक कर निर्धारक व संकलक यांचा अहवाल नाही.

३) दिनेश कंन्स्ट्रक्शन कं. शालीग्राम बि.नं.५

अर्ज आवक झालेला नाही. निरिक्षक कर निर्धारक व संकलक यांचा अहवाल नाही. ॲग्रीमेंट नाही.

४) शकील महमंद मोहम्मद रजा शहा व इतर नाला रोड मुंशी कंम्पाउंड नोटरीकृत पेपर आहेत. मालकी जागेबाबत कागदपत्रे नाहीत.

५) सलमा इसाक कुरेशी

हयांच्या कर आकारणीसाठी अर्ज नाही. फक्त नोटरीकृत केलेले ॲग्रीमेंट आहे. जागा मालकीबाबत कागदपत्रे नाहीत. निरिक्षकांचा अहवाल स्पष्ट नाही.

६) संपतप्रसाद सिताराम गुप्ता व इतर मुंशी कंम्पाउंड ॲग्रीमेंट रजिस्टर नाही.

७) मे. लक्ष्मीकृपा रहिवासी

ॲग्रीमेंटवरील तारीखेप्रमाणे कर आकारणी होणे आवश्यक असताना १/४/२००३ पासुन कर आकारणी झालेली आहे. खुलासा करावा

८) श्री. वसिष्ठ वामन बहिर

यांचे नांव गाळलेली नोंद घेताना बदललेले आहे. ॲग्रीमेंट नाही. नांवात बदल करताना इतर कागदपत्रे नाहीत.

९) मे. कावेरी प्लेझंट पार्क काशीमिरा

ॲग्रीमेंट नाही. मुद्रांक शुल्क पावती करारनामा नोंदणी फी पावती जोडलेली नाही.

<u>परि.क्र..६०) वॉर्ड क्र. E-5 मिरा रोड येथील कर आकारणीतील अनियमितता:</u>

१) मे. विनम्र डेव्हलपर्स

पुनम सागर कॉम्पेक्स ॲग्रीमेंटमध्ये जागाक्षेत्र दिसुन येत नाही.

२) पी.एस्.के. कंन्स्ट्रक्शन

ॲग्रीमेंटच्या पहिल्या पानाची झेरॉक्स असल्याने जागाक्षेत्र समजून येत नाही.

३) सुंदर सरोवर, सुंदर ड्रेव्हलपर्स

ॲग्रीमेंट नाही. त्यामुळे जागाक्षेत्र समजून येत नाही.

४) सरोज पी. वोरा पेणकरपाडा

ॲग्रीमेंट नाही. त्यामुळे जागाक्षेत्र समजून येत नाही.

५) निरज डेव्हलपर्स प्रा.लि.

पुनमसागर कॉम्लेक्स ॲग्रीमेंट नाही. त्यामुळे जागाक्षेत्र पडताळणी करता येत नाही.

६) रविन्द्र सखाराम तावडे

जागेबाबत कागदपत्रे नाहीत. निरिक्षक, अधिक्षक, लिपीक यांचा स्पष्ट अहवाल नाही.

७) वसुंधरा २

पुनमसागर कॉम्लेक्स E-5 ॲग्रीमेंट नाही. त्यामुळे जागाक्षेत्र समजून येत नाही.

८) पी.एस.के. इंटरप्रायजेंस रिजन्सी एनक्लेव्ह

ॲग्रीमेंट नाही. रजिस्ट्रेशन स्टॅम्पडयूटी भरणा केलेल्या पावत्या नाहीत.

९) अस्मिता उपहार II

ॲग्रीमेंट नाही. स्टेटमेंटवर नंतर खाडाखोड केलेली आहे. नांवात बदल केलेला आहे.

१०) अस्मिता उपहार III

ॲग्रीमेंट नाही. स्टेटमेंटवर नंतर खाडाखोड केलेली आहे. नांवात बदल केलेला आहे.

११) अस्मीता गार्डन

करारनामा नाही. लिपीक निरिक्षक, कर संकलक यांचा स्वयंस्पष्ट अहवाल नाही. रजिस्ट्रेशन पावती नाही.

१२) सुंदर डेव्हलपर्स- सुलभा सदन गोडदेव फाटक रोड

सुंदर सरोवर या इमारतीस कर आकारणी ज्या वर्षी झाली. त्यावेळी सर्व सदनिकांना कर आकारणी करण्यांत आली नाही. त्यामुळे काही सदनिका राहून गेल्यामुळे कराची आकारणी नंतर करण्यांत आली आहे. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान होत आहे. त्यावर नियंत्रण असणे आवश्यक आहे.

**परि.क्र. ६१) मुर्धा,राई,डोंगरी,उत्तन विभागातील कर आकारणी प्रकरणांमधील अनियमितता**

१) श्री. भुपेन्द्र टाक, उत्तन

७/१२ उतारा हा भूमापन क्र. २८५ अ चा असुन कर आकारणी धारकाने नमुद केलेला सर्व्हे नं. २८७ जुळत नाही. अर्जदाराने नमुद केलेल्या मोजमापामध्ये खाडाखोड केली आहे. अर्जदाराने सन २००२-०३ या वर्षात आकारणीसाठी अर्ज केलेला असताना २००३-०४ या वर्षात आकारणी केलेली आहे.

२) एलीस पागू पिरेल, उत्तन

सन १९८५-८६ नंतर नोंद नसल्याचे नमुद करित असताना टिप्पणीत १९८९-९० पर्यंत दगड मातीच्या घराची नोंद असुन १९९०-९१ नंतर कर आकारणी झाली नसल्याने व आता 18x13 च्या मोजमापाचे पक्के घर असल्याचे नमुद केले आहे. सन २००४-०५ पर्यंतच्या कर वसुली बद्दल काय कार्यवाही करण्यांत आली व पक्के लोड बेअरींगचे घर कुठल्या वर्षात बांधण्यात आले व त्या वर्षापासुन सुधारीत दराने कर आकारणी आवश्यक आहे तसेच आता 18x13 या मोजमापाप्रमाणे आकारणी केली आहे. परंतु त्याची परिगणना चुकीची आहे.

३) श्री. डग्लस बेवू, उत्तन

सदर प्रकरणातील भाडयाचा दर मालमत्तेचे मोजमाप व कर आकारणीचा कालावधीविषयी स्पष्टीकरण आवश्यक आहे.

४) पिटर आसु आंबो, उत्तन

अर्जदार सन १९९४-९५ पासुन याच ठिकाणी रहात असल्याने निवडणूक ओळख पत्रावरुन दिसते व अर्जदार सुध्दा त्यांच्या अर्जात घरपट्टी आकारणी न केल्याबद्दल तक्रार करित असताना सुध्दा सन २००४-०५ या वर्षापासून कर आकारणी करण्यांत आली आहे. तरी या विषयी खुलासा व्हावा. सदर प्रकरणाची तपासणी शिपाई यांने केली असल्याचे

कर लिपीकाने नमुद केले आहे. ही बाब योग्य नसल्याने या विषयी स्पष्टीकरण आवश्यक आहे. कर आकारणी तक्त्यावर उपायुक्तांची सही नाही.

५) स्टिवन वेलमेंट आंबो, उत्तन

शिधापत्रिकेवरुन अर्जदार १९८७ पासुन उक्त ठिकाणी रहात असताना २००४-०५ पासुन कर आकारणी करण्याचे प्रयोजन काय? पत्र्याच्या घराला रु.०.३२ पैसे भाडयाचा दर आकारणीविषयी खुलासा करावा. तसेच शिपायांनी पाहणी करुन मोजमाप ठरविण्याविषयी स्पष्टीकरण व्हावे. उपयुक्तांची सही आवश्यक आहे.

६) येलीस अंतोन नुनीस, उत्तन

वाढीव कर आकारणीत मुळ कराची रक्कम समाविष्ट होणे आवश्यक आहे. उपयुक्तांची स्टेटमेंटवर सही नाही सही आवश्यक आहे.

७) सुहासिनी दिलीप बंड उत्तन

अर्जदार किंवा कार्यालयीन टिपणीत जागा क्षेत्राचा उल्लेख नाही. जागाक्षेत्र मोजमाप होणे आवश्यक आहे. तसेच यापूर्वीची कर आकारणी रद्द होणे आवश्यक आहे.

८) भुपेन्द्र दामजीभाई टाक, उत्तन

अर्जदाराने सन २००० पूर्वीच पक्के घर बांधकाम केल्याचे त्यांच्या अर्जावरुन दिसते. परंतु कर आकारणी सन २००४-०५ या वर्षात करण्यांत येत आहे. तरी या विसंगतीबाबत खुलासा करावा.

९) प्रदिप रामचंद्र सातपुते, उत्तन

अर्जदार १९९२ पासुन सदर ठिकाणी रहात असल्याने नमुद करित असताना व २००३-०४ या वर्षात अर्ज केलेला असताना कर आकारणी २००४-०५ पासुन करण्याचे प्रयोजन काय?

१०) अशोक भाऊ म्हात्रे, उत्तन

अर्जदार हे बऱ्याच वर्षापासुन सदर जागी रहात असल्याचे त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रावरुन दिसते. तसेच त्यांचा अर्जसुध्दा २००३-०४ या वर्षात प्राप्त झाला आहे. असे असताना सन २००४-०५ या वर्षापासुन कर आकारणी केली आहे. याबाबत खुलासा करावा.

११) शमीम झियाउद्दीन रावतार, उत्तन

अर्जदाराने २००२-०३ मध्ये अर्ज केला असताना २००३-०४ पासुन कर आकारणी करण्याचे प्रयोजन काय? सध्याची परिगणना तपासण्यांत यावी.

१२) श्रीम. उषा राजेश तरेश्वर, उत्तन

अर्जदाराचा सन २००३-०४ या वित्तीय वर्षामध्ये कर आकारणीसाठी अर्ज प्राप्त झाला असताना २००४-०५ या वित्तीय वर्षात कर आकारणी केलेली आहे. तरी खुलासा करावा.

१३) रेवती चंद्रकांत पाटील, उत्तन

अर्जदाराच्या अर्जाप्रमाणे कर आकारणी २००३-०४ या वित्तीय वर्षापासुन होणे आवश्यक आहे.

१४) ओमप्रकाश रामदिन यादव, मुर्धागांव रेवा आगर

अर्जदार आठ वर्षापासुन रहात असताना सन २००४-०५ पासुन कर आकारणी करण्याचे प्रयोजन काय?

१५) भगवान आत्माराम पाटील, मुर्धागांव

वाढीव कर आकारणीमध्ये मुळ कराची रक्कम समाविष्ट होणे आवश्यक आहे.

१६) श्री. हरेश्वर हरि म्हात्रे, मुर्धा

जुनी झोपडी तोडून नविन घर बांधलेले आहे. जुनी आकारणी रद्द होणे आवश्यक आहे.

१७) श्रीम. सुमन जमनादास माछी

अर्जदार यांचेकडे १९९५ पुर्वीचे पुरावे असताना त्यांना २००३-०४ या वर्षात कर आकरणी करण्यांचे प्रयोजन काय?

१८) श्री. मधुकर दत्तात्रय राजमाने

जागा खरेदीखत रजिस्टर नाही.

१९) श्री. रविकांत द्वारकानाथ पाटील

खाते नं. १०६२ आकारणी रजिस्टरला श्री. भानुदास द्वारकानाथ पाटील नांव आहे. त्यानंतर वाढीव बांधकाम केल्याने नांवात बदल केलेला आहे. (रविकांत द्वारकानाथ पाटील) आकारणी तक्त्यामध्ये खाडाखोड करुन नावांत बदल केले आहे.

२०) स्वॉलेट मॉटीव्ह कल्लूर, उत्तन

अर्जदाराच्या अर्जाप्रमाणे २००३-०४ या वित्तीय वर्षापासुन कर आकारणी होणे आवश्यक आहे.

परि. क्र. ६२) कर वसूलीबाबत

सन २००४-०५ या वित्तीय वर्षामध्ये लेखा विभागाप्रमाणे मालमत्ता करापोटी रु. २४,७०,४७,०००/- एवढी प्रत्यक्षात वसूली झाली असतांना कर विभागाच्या विवरण प्रत्राप्रमाणे रु. २४,७१,२१,६६८/- एवढी रक्कम दहीविण्यात आली आहे. म्हणजेच दोन विभागांमधील जमा रक्कमेत रु. ७४,६६८/- ची तफावत आहे. तरी सदरच्या तफावतीबाबत खुलासा करण्यात येवून ताळमेळ घालण्यात यावा.

या वित्तीय वर्षी कर वसुली ही अर्थसंकल्पीय तरतुदींच्या तुलनेत फक्त ६६.७६% झाली आहे. म्हणजेच कर विभागाकडुन वसूलीचे प्रमाण कमी आहे किंवा अर्थसंकल्पामधील तरतूद ही वास्तवाशी धरुन नसल्याने निर्देशनास येते. तरी याबाबत स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे.

तसेच कर विभागाकडून मालमत्ता करासोबत शिक्षण उपकर व रोजगार हमीकर वसुल केला जातो. परंतु शासनाने शासन निर्णय क्र.आरडीएस-१०२००५/प्र.क्र.३१/२००५/ नवि-१६ दि.३१/३/०५ नुसार मनपास देय असलेले सर्वसाधारण रस्ते अनुदान रु. ५,४१,८०,०००/- मधून शिक्षण उपकर व रोजगार हमीकरापोटी रु. २८,९७,०००/- समायोजित केले आहे. तरी या समायोजनाबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

परि. क्र. ६३) भाडे वसूलीबाबत

सन २००४-०५ या वित्तीय वर्षामध्ये रु. ५ लक्ष भूईभाडे वसूली अपेक्षित असतांना फक्त रु. ८२ हजार वसूली झाली आहे. उपहार गृह भाडयापोटी काहीही वसूली झालेली नाही. म्हणजेच उपहार गृहाची जागा रिकामीच पडून आहे. परिणामी मनपा महसूल बुडत आहे. शाळा इमारत व मॅरेज हॉल भाडयापोटी रु. ३,७१,८३,०००/- एवढया रक्कमेची तरतूद करण्यात आली होती. परंतु प्रत्यक्षात रु. १,५२,०००/- एवढीच रक्कम म्हणजेच ०.४०% रक्कम जमा झाली आहे. यावरुन सदरची तरतूद ही वास्तवाशी धरुन नसल्याचे दिसून येते. तसेच बोट रायडींग व भूसंपादन जागा भाडे पोटी करण्यात आलेली तरतूद रु. ४,५०,०००/- व रु. १५,००,०००/- अनुक्रमे यापैकी काहीही रक्कम जमा झालेली नाही. त्यामुळे मनपा महसुल बुडाला आहे. उपरोक्त सर्व बांबीबाबत स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे.

परि. क्र. ६४) कर विभाग कार्यप्रणाली बाबत.

कर विभागाद्वारे खाली बार्बीबाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे.

पोटकीर्दीतील पृष्ठे सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणीत करावीत व पोटकीर्द रोजच्या रोज बंद करणे आवश्यक आहे. पावती पुस्तके सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणीत करावीत.

करदात्याकडून प्राप्त होणारी रक्कम सर्व विभागातील संबंधीत कर्मचारी टेबलाच्या खणामध्ये ठेवतात त्यासाठी प्रत्येक ठिकाणी रोखपेटींची व्यवस्था करण्यात यावी. दिवसभर जमा झालेली रोख रक्कम शिपाई स्वत: सार्वजनिक वाहनाने प्रवास करुन मुख्य कार्यालयात भरतात त्यास्तव रोख रक्कमेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून उपाय योजना करण्यात यावी. करदात्यांकडून दुबारा मागणीची प्रकरणे निदर्शनास आली आहेत. अशी प्रकरणे भविष्यात होणार नाहीत याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

## पाणीपुरवठा विभाग

### परि. क्र. ६५) पाणीपट्टी वसूली बाबत

सन २००४-०५ या वित्तीय वर्षामध्ये पाणीपट्टी व जलउपकरापोटी रु. १४,०८,००,०००/- एवढी अर्थसंकल्पीय तरतूद दर्शविण्यात आली आहे व तरतूदीच्या तुलनेत १०२.३०% वसूली झाली आहे. परंतू प्रत्यक्षात पाणी पुरवठा विभागाची सन २००४-०५ या वर्षासाठी मागणीच मुळात रु. १५,९३,११,२३५/- एवढी आहे म्हणजेच तरतूद ही वास्तवाशी धरून नसल्याचे निदर्शनात येते. अनधिकृत नळ जोडणीची प्रकरणे शोधण्यात येवून नियमित करणे आवश्यक आहे. त्यासाठी या वित्तीय वर्षामध्ये १५० लाखाची महसूली जमा अपेक्षीत असतांना फक्त रु. ३१.३३ लाख एवढी रक्कम जमा झालेली आहे.

## वाहन विभाग

### परि. क्र. ६६) वाहनांवरील खर्चावर नियंत्रण ठेवण्याबाबत.

वाहन विभागाकडील वाहनांना लागणारे इंधन व त्यांच्या दुरुस्तीवर यावर्षी रु. ७५,३४,०००/- एवढया मोठया प्रमाणात खर्च झाला आहे व खाजगी गाडया भाडयाने घेण्यासाठी व भाडयाची भरपाई देण्यासाठी रु. ३६,५३,०००/- एवढा खर्च झालेला आहे. वाहन विभागातील बरीच वाहने बऱ्याच वेळा दुरुस्तीसाठी गॅरेजमध्ये असतात त्यामुळे दुरुस्तीचा खर्च सतत वाढत आहे व त्याचवेळी नादुरुस्त वाहनाऐवजी भाडयाने वाहन घ्यावे

लागत असल्याने वाहन भाडयावरील खर्च सुध्दा वाढतो व आपणामधील वाहन चालक कामाविना बसून असल्याचे चित्र दिसते यासाठी वाहन विभागात प्रभावी नियंत्रणाची आवश्यकता आहे. तसेच शासन निर्णय दि. ०१/१०/१९९१ नूसार वारंवार नादुरुस्त होणाऱ्या वाहनाविषयी कार्यवाही करण्यात यावी. या नियमानुसार ज्या वाहनांचे आयुष्य पूर्ण झाले अथवा आवश्यक प्रवास पूर्ण झाला. त्या वाहनांबाबत समक्ष अधिकाऱ्याच्या परवानगीने निरुपयोगी ठरविण्याविषयी कार्यवाही करण्यात यावी.

## नगररचना विभाग

### परि. क्र. ६७) विकास आकार वसूलीबाबत

सन २००४-०५ या वित्तीय वर्षासाठी इमारत परवाना फी-विकास आकारासाठी अर्थसंकल्पामध्ये ८४० लाखाचे जमेचे उदि्दष्ट असतांना फक्त रु. ४७६.३४ लाख म्हणजेच ५६.६८% वसूली झाली आहे. याचा अर्थ तरतूद ही वास्तवाशी धरुन नाही अथवा विभागाकडून विकास आकाराची वसूली योग्य प्रमाणात झाली नाही याबाबत स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे.

तसेच विकास शूल्काचे सध्याचे दर हे नगरपालिका असतांनाचे असल्याने आता महानगरपालिका झाल्याने विकास शूल्कात वाढ केल्यास मनपाचे उत्पन्न वाढु शकेल.

## आरोग्य विभाग

### परि. क्र. ६८) घनकचरा प्रकल्पाबाबत

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळातर्फे सर्वे नं. ६५ व सर्व्हे नं.२५; पाली व उत्तन येथे घनकचरा प्रकल्प स्थापण्यासाठी व त्यासाठी पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी संमती देण्यात आली होती व सदरचा प्रकल्प दि. ३१/१२/२००३ पूर्वी सुरु होणे आवश्यक होते. परंतु सदरचा प्रकल्प अदयाप कार्यरत न झाल्याचे निदर्शनास येते. त्याप्रकल्पासाठी आवश्यक निविदा मागविण्यात आल्या असून मंजूर कंत्राटदारास, कंत्राटाच्या शर्ती प्रमाणे आगाऊ प्रदान सुध्दा करण्यात आल्याचे कळते. परंतु पायाभूत सुविधा निर्माण न करण्यात आल्याने

अदयाप प्रकल्प प्रलंबित असल्याचेही कळते. तरी सदर प्रकल्पाच्या प्रगती विषयी व विलंबाबाबत स्पष्टीकरण आवश्यक आहे.

## शिक्षण विभाग

### परि. क्र. ६९) रजा वेतन व निवृत्ती वेतन अंशदानाबाबत.

सन १९९४ साली जिल्हा परिषदेकडुन महानगरपालिकेकडे (तात्कालीन नगरपालिका) १९४ शिक्षक बदली झाले आहेत परंतु रजावेतन व निवृत्तीवेतन अंशदानाची रक्कम अदयाप जिल्हा परिषदेने महानगरपालिकेकडे वर्ग केलेली नाही तरीसुध्दा महानगरपालिकेकडून वेळोवळी सेवानिवृत होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीचे लाभ देण्यात येत आहेत तरी सदरच्या अनियमिततेबाबत स्पष्टीकरण करण्यात यावे.

## बांधकाम विभाग

### परि. क्र. ७०) मालमत्तेची वार्षिक पडताळणी

*बांधकाम विभागाने महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ मधील नमुना क्र.* १२८ व १२९ च्या नमुन्यात स्थावर मालमत्ता व जमिनीची नोंद घेणे आवश्यक असून नियम क्र. १५६ नुसार मालमत्तेची वार्षिक पडताळणी करणे आवश्यक आहे.

तसेच शासनाने शासन निर्णय क्र. आरडीएस-१०२००५/प्र.क्र.३१/२००५/नवि-१६ दि.३१/३/०५ नुसार मनपास रस्ते अनुदानापोटी प्राप्त होणारी रक्कम रु.५,४१,८०,०००/- मधून कब्जा हक्काची रक्कमेपोटी रु. ५,१२,८३,०००/- समायोजित केली आहे. वास्तविक सदरच्या अनुदानाची रक्कम नवीन रस्ते अथवा रस्ते दुरुस्तीसाठी वापरणे आवश्यक असताना समायोजन करण्यात आले आहे. तरी कब्जा हक्काच्या रक्कमेचे कुठल्या बाबीबाबत मनपाला शासनाचे देणे अदयाप बाकी होते. त्याविषयी स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. शासनाकडील कुठलेही प्रकारची रक्कम महानगरपालिकेकडे नाही. सदरची रक्कम शासनाने वजा करून [illegible] समायोजित करण्यात आलेली आहे. करिता आक्षेप वगळण्यात यावा.

## जन्ममृत्यू विभाग

### परि. क्र. ७१) दाखल्यांबाबत

जन्ममृत्यू विभागाद्वारे जन्म व मृत्यूच्या नोंदी घेण्यात येतात परंतू ज्या कागदपत्राच्या आधारे नोंदवहिमध्ये नोंदी घेण्यात येतात ती कागदपत्रे आवश्यकता पडल्यास तातडीने उपलब्ध होण आवश्यक आहे. तसेच जन्म मृत्यूच्या नोंदी ज्या नोंदवहीत घेण्यात येतात त्या नोंदी तात्कालीन निबंधकांनी स्वाक्षरीत केल्या नसल्याने त्या नोंदीच्या सत्यतेबद्दल खात्री होत नाही.

## वाचनालय विभाग

6/4/2010 रोजी आक्षेप वगळला
2005.05

### परि. क्र. ७२) मोजणी बाबत.

सध्या वाचनालय विभागाच्या कर्मचाऱ्यांकडूनच पुस्तकांची मोजणी दर दोन वर्षांनी केली जाते. वास्तविक पुस्तकांची मोजणी ही प्रत्येक वर्षाच्या अखेरीस वाचनालय कर्मचाऱ्यां व्यतिरिक्त इतर विभागातील कर्मचारी / अधिकाऱ्यांकडून होणे आवश्यक आहे. पुस्तके वाळवी लागून खराब होवू नये म्हणून कीटकनाशके फवारुन काळजी घेणे आवश्यक आहे.

## नगरभवन विभाग

### परि. क्र. ७३) उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्याबाबत.

नगरभवन समोर नैसर्गिक पाण्याचे तळे उपलब्ध असल्याचे दिसते. त्या तळयाचे व्यावसायिक दृष्टीकोनातून विकास (तरणतलाव वगैरे) केल्यास त्यामधुन मनपाला महसूल मिळू शकतो तसेच शहराला एखादी सुविधा उपलब्ध होवू शकेल.

तसेच नगरभवनमधील हॉल लग्न व इतर कार्यक्रमांसाठी भाडयाने दिला जातो. या हॉलचे भाडे ठराव क्र. ५४० दि. २८/२/१९९६ अन्वये रु. ३०००/- लग्न कार्यासाठी व रु. २५०/- इतर कार्यक्रमासाठी ठरविण्यात आले आहे. तरी सदर हॉलमध्ये अधिक सोयी

सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने व मुळातच अनुषंगिक बाबींमध्ये झालेल्या भाववाढीच्या दृष्टीकोनातुन हॉलच्या भाडयात वाढ केल्यास उत्पन्न वाढु शकेल

## वन विभाग

### परि. क्र. ७४) झाडांची निगा

मनपाद्वारे शहरामध्ये झाडे लावण्यावर लाखो रुपये खर्च होतात तथापि लावलेली झाडे योग्य निगा न राखल्याने बरीच झाडे जगत नाहीत व मनपाचा पैसा वाया जातो. शहरात झाडे लावतांना त्यासाठी योग्य नियोजन असणे आवश्यक असून योग्य निगा राखणे आवश्यक आहे.

मुख्यलेखापरिक्षक
मिरा-भाईंदर महानगरपालिका.